# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**(सायंकाळ)**

**दिनांक २४.०८.२०२६ सोमवार**

**नागपुर शहर पोलीसांची पो.ठाणे मानकापुर हद्दीतील वायु गळती घटनेबाबत तत्परता.**

दिनांक २४.०८.२०२६ चे ००.४५ वा. चे दरम्यान, पोलीस नियंत्रण कक्ष येथुन फागोजी ले—आऊट, गोधणी रेल्वे येथे गॅस गळतीबाबत दुर्गंधी येत असल्याचा कॉल बिटमार्शल यांना प्राप्त झाला. तसेच, परिसरातील नागरीक यांचेकडुन पोलीसांना माहिती मिळाली की, प्रितपाल सिंग ॲन्ड कंम्पनी फागोजी ले—आऊट, गोधणी रेल्वे (जल शुध्दीकरन प्लांट) येथे गॅस गळती होवुन, नागरीकांना श्वसनाचा त्रास होत आहे. घटनेचे गांभीर्य लक्षात घेवुन घटनास्थळी पोलीस विभागाचे वरिष्ठ अधिकारी, वपोनि. पोलीस ठाणे मानकापुर व त्यांचे ईतर अधिकारी व अंमलदार हे घटनास्थळी तात्काळ हजर झाले.

पोलीसांनी पोलीस वाहनातुन श्वासाच्या त्रासाने बाधीत झालेल्या नागरीकांना पहिल्या अर्ध्या तासात (गोल्डन अव्हरमध्ये) वेगवेगळ्या रूग्णालयात रवाना केले. काही नागरीक स्वत: देखील हॉस्पीटल येथे रवाना झाले. घटनेचे गांभीर्य लक्षात घेवुन, पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी अनाऊंन्समेंट करून तसेच, घरोघरी जावुन अडकलेल्या शेकडो नागरीकांना सुरक्षित ठिकाणी हलविण्याची कार्यवाही केली. सुमारे ४० ते ५० बाधीत व्यक्तींना विविध रूग्णालयात दाखल करण्यात आले. त्यानंतर घटनास्थळाच्या २०० मिटर परिसरात बॅरीगेटींग करून परिसर सिल करण्यात आला व नागरीकांना प्रवेश करण्यास मनाई करण्यात आली. पोलीस नियत्रंण कक्षामार्फत अग्निशमन विभाग, ओ.सी.डब्ल्यु, रूग्नवाहीका व एन.डी.आर.एफ यांना घटनेबाबत माहिती देवुन, त्यांना पाचारण करून घेतले. महसुल विभागाचे अधिकारी देखील तेथे हजर आले.

ओ.सी.डब्ल्यू चे सिनियर हेल्थ सेफ्टी ऑफिसर व ईतर यांनी विचार—विनिमय करून, रेस्क्यु टिम तयार केल्या. गॅसगळती ठिकाणी विविध उपाय योजना करून, एन.डी.आर.एफ, ओ.सी.डब्लु व फायर ब्रिगेड यांनी संयुक्त कार्यवाही करून पुर्ण वायुगळती आटोक्यात आणली व वायु गळती थांबल्याचे त्यांनी घोषीत केले. तज्ञांच्या सांगण्यावरून घटनास्थळ परिसरात सकाळी ११:०० वा पावेतो सामान्य नागरीकांना प्रवेश बंद करण्यात आला होता. मा. श्री. कुमार आशीर्वाद जिल्हा अधिकारी, नागपुर यांनी घटनास्थळाला भेट देवुन सविस्तर आढावा घेवुन, त्यांनी संबंधीत विभागांना घटनेची चौकशी करण्याबाबतचे आदेश दिले आहे. पोलीस ठाणे स्तरावर देखील घटनेची नोंद घेण्यात आली असुन प्राथमीक चौकशी सुरू आहे. घटनास्थळी शांतता असुन सुरक्षेसंबंधाने पोलीस बंदोबस्त लावण्यात आला आहे.

नागपुर शहर पोलीस यंत्रणेने अतिशय कमी कालवधीत, मोठ्या प्रमाणात लोकांना स्थलांतरीत करून तसेच, वायु गळतीने बाधीत व्यक्तींना रूग्णालयात पाठविले. व इतर यंत्रणांशी समन्वय साधुन गॅस गळती आटोक्यात आणण्याची कार्यवाही पार पाडली असुन, त्यामुळे मोठया प्रमाणात लोकांचे जिवीतास धोका निर्माण होण्यापासुन वाचविण्यात यश आलेले आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील पोलीस आयुक्त, नागपुर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी, सह पोलीस आयुक्त, नागपुर शहर, मा. श्रीमती विनीता साहु अपर पोलीस आयुक्त (उत्तर विभाग), नागपुर

शहर यांचे निर्देशाप्रमाणे, मा. श्रीमती अन्नपुर्णा सिंग पोलीस उप आयुक्त, (परि. क्र. ०२), मा. श्री. आदीत्य मिरखेलकर पोलीस उप आयुक्त, (वाहतुक), मा. श्री. सत्यविर बंडीवार सहायक पोलीस आयुक्त, (सदर विभाग), मा. श्री. रोहीत ओव्हाळ सहा. पोलीस आयुक्त (पारडी विभाग) यांचे मार्गदर्शनात, वपोनि. हरेश काळसेकर, मसपोनि. निशा खोब्रागडे, पोउपनि. गोपाल राऊत, पोहवा. प्रदिप चिमोटे, रूपम टेंभेकर, जितेन्द्र, ८७ सयाम, पोअं. सिध्दार्थ मंडपे, अनुप यादव, अजय घाटे आणि विजय बोंडे यांनी केली.

**(कामगिरी)**

**१) परिमंडळ क्र. ४ अंतर्गत कुख्यात गुंडांची टोळी हद्दपार :-**

पोलीस आयुक्तालय, नागपूर शहर, परिमंडळ क्र. ०४ अंतर्गत पोलीस ठाणे ईमामवाडा हद्दीत राहणारे कुख्यात गुन्हेगार टोळी प्रमुख नामे १) सचिन प्रदीप वासनिक, वय ३५ वर्षे, रा. जाटतरोडी नं. १, इंदीरा नगर, ईमामवाडा, नागपूर तसेच त्याचे साथीदार २) सबास्टीन उर्फ सिबु सफेल ॲन्थोनी, वय ३२ वर्षे, रा. जाटतरोडी नं. ३, इंदीरा नगर, ईमामवाडा, नागपूर ३) अभिषेक रविंद्र बोरकर, वय ३० वर्षे, रा. जाटतरोडी नं. १, इंदीरा नगर, ईमामवाडा, नागपूर यांचेविरूध्द पोलीस ठाणे ईमामवाडा येथे टोळी तयार करुन गंभीर स्वरुपाचे गुन्हे ज्यामध्ये दुखापत करणे, धमकी देणे, खुन, खुनाचा प्रयत्न, शिवीगाळी करणे, खंडणी,अपहरण असे विविध गुन्हे दाखल असुन, त्यांचेवर वारंवार प्रतिबंधक कारवाई करूनही त्यांचे प्रवृत्तीत कोणतीही सुधारणा झाली नाही. नमुद गुन्हेगार इसमांचे वर्तणुकीत सुधारणा व्हावी, याकरीता ईमामवाडा पोलीसांनी आरोपीविरूध्द हद्दपार प्रस्ताव तयार करून, मा. श्रीमती रश्मीता राव पोलीस उपायुक्त, परिमंडळ क्र. ०४, नागपुर शहर यांचेकडे सादर केला. मा. पोलीस उपायुक्त, परिमंडळ क्र. ०४, नागपुर शहर यांनी हददपार आदेश क्र. १०/२०२६ दिनांक १४.०८.२०२६ अन्वये सर्व गुन्हेगारांना नागपूर शहर व नागपुर ग्रामीण हद्दीतून ०२ वर्षाकरीता हद्दपार करण्याचा आदेश पारीत केलेला आहे. आरोपी क्र. १ व ३ यांना त्यांचे नातेवाईकांकडे पोलीस ठाणे पुलगाव जि. वर्धा हद्दीत सोडण्यात आले आहे. तसेच आरोपी क्र. २ यास पोलीस ठाणे रामनगर हद्दीत जि. वर्धा येथे सोडण्यात आले आहे.


सचिन


सबास्टीन


अभिषेक

तसेच, पोलीस ठाणे ईमामवाडा हददीत, रामबाग, ईमामवाडा, नागपूर येथे राहणारा गुन्हेगार ईसम नामे प्रियांशु उर्फ लक्की मोहन ठाकरे, वय २१ वर्षे याचेविरूध्द पोलीस ठाणे ईमामवाडा येथे दुखापत करणे, मारपिट करणे, जिवे मारण्याचा प्रयत्न करणे, दरोड्याची तयारी ईत्यादी गंभीर स्वरूपाचे ०४ गुन्हे दाखल असुन, त्याचेवर वारंवार कारवाई करूनही त्याचे प्रवृत्तीत कोणतीही सुधारणा झाली नाही. नमुद गुन्हेगार इसमाचे वर्तणुकीत सुधारणा व्हावी, याकरीता ईमामवाडा पोलीसांनी आरोपीविरूध्द हद्दपार प्रस्ताव तयार करून, मा. पोलीस उपायुक्त, परीमंडळ क्र. ०४ नागपुर शहर याचेकडे सादर केला. मा. पोलीस उपायुक्त, परीमंडळ क्र. ०४, नागपुर शहर यांनी हददपार आदेश क्र. ११/२०२६ दिनांक १४.०८.२०२६ अन्वये गुन्हेगारास नागपूर शहर व नागपुर ग्रामीण हद्दीतुन ०६ महीन्याकरीता हद्दपार करण्याचा आदेश पारीत केला. नमुद गुन्हेगाराचे हद्दपार आदेशाची अंमलबजावणी करण्यात आली असुन, ईमामवाडा पोलीसांनी नमुद हद्दपार इसमास त्याचे नातेवाईक पोलीस ठाणे रामनगर, जि. वर्धा येथे त्याचेकडे सोडलेले आहे.



प्रियांशु उर्फ लक्की

तसेच, पोलीस ठाणे ईमामवाडा हददीत, प्लॉट नं. २५५ उंटखाना, ईमामवाडा, नागपूर येथे राहणारा गुन्हेगार ईसम नामे रवि उर्फ ऋषी भाऊराव हाडके, वय २४ वर्षे याचेविरूध्द पोलीस ठाणे ईमामवाडा येथे दुखापत करणे, मारपिट करणे, चोरी, छेडखानी, दरोडा, जिवे मारण्याचा प्रयत्न करणे, दरोड्याची तयारी ईत्यादी गंभीर स्वरूपाचे १५ गुन्हे दाखल असुन, त्याचेवर वारंवार कारवाई करूनही त्याचे प्रवृत्तीत कोणतीही सुधारणा झाली नाही. नमुद गुन्हेगार इसमाचे वर्तणुकीत सुधारणा व्हावी, याकरीता ईमामवाडा पोलीसांनी आरोपीविरूध्द हद्दपार प्रस्ताव तयार करून, मा. पोलीस उपायुक्त, परीमंडळ क्र. ०४ नागपुर शहर याचेकडे सादर केला. मा. पोलीस उपायुक्त, परीमंडळ क्र. ०४, नागपुर शहर यांनी हददपार आदेश क्र. ०९/२०२६ दिनांक १४.०८.२०२६ अन्वये गुन्हेगारास नागपूर शहर व नागपुर ग्रामीण हद्दीतुन ०२ वर्षाकरीता हद्दपार करण्याचा आदेश पारीत केला. नमुद गुन्हेगाराचे हद्दपार आदेशाची अंमलबजावणी करण्यात आली असुन, ईमामवाडा पोलीसांनी नमुद हद्दपार इसमास त्याचे नातेवाईक पोलीस ठाणे डोंगरगड, जि. राजनांदगांव, छत्तीसगढ येथे त्याचेकडे सोडलेले आहे.



रवि उर्फ ऋषी

अशाप्रकारे पोलीस ठाणे ईमामवाडा हद्दीतील ०३ गुन्हेगारांची टोळी व ०२ सराईत आरोपींना हद्दपार करण्यात आले आहे. मा. श्री. विश्वास नांगरे पाटील पोलीस आयुक्त, नागपुर शहर यांचे निर्देशाप्रमाणे गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींनी आपले गुन्हेगारी कृत्य सुरूच ठेवल्यास त्यांचे विरूध्द तडीपार, एम.पी.डी.ए. मोका अंतर्गत कठोर कायदेशिर कारवाई करण्यात येणार आहे. गुन्हेगारी कारवायांना कोणत्याही परिस्थीतीत थारा दिला जाणार नसुन समाजातील शांतता व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी अशा व्यक्तींवर नागपूर शहर पोलीस तर्फे कठोर कारवाई करण्यात येणार आहे. छायाचित्रातील हद्दपार ईसम नागपुर शहरात आढळुन आल्यास पो.ठाणे ईमामवाडा अथवा डायल ११२ वर कळवावे.

**२) कळमना पोलीसांची कामगीरी :— घरफोडी करणाऱ्या आरोपींना अटक.**

दिनांक ०४.१२.२०२५ रोजी ते दिनांक ०५.१२.२०२५ रोजीचे दरम्यान, पोलीस ठाणे कळमना हद्दीत, गुजराती कॉलोनी, कळमना, नागपूर येथे राहणारे फिर्यादी राहुल भिमजीयानी, हे आपले राहते घरी परीवारासह बाहेर गावी गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे राहते घरी चोरी करून एकुण १,२९,८१९/—रू.

चा मुद्देमाल चोरून नेला. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कळमना येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ), ३३१(३), ३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे तपासादरम्यान कळमना पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रीक तपास करून, आरोपी १) मुबारक वकीलबाबु शहा, वय २१ वर्षे, रा. कुंदनलाल गुप्ता नगर, बंडु किराणा जवळ, यशोधरानगर, नागपुर २) फैजान खान अजीम खान, वय २७ वर्षे, रा. राजीव गांधी नगर, यशोधरानगा, नागपुर यांना निष्पन्न केले. आरोपी क्र. १ यास ताब्यात घेवुन, विचारपुस केली असता, त्याने चोरी केलेल्या मुद्देमालापैकी त्याचे हिश्यात आलेला मुद्देमाल पाहीजे आरोपी नामे १) निकेश बलराज शाहु, वय २५ वर्षे, रा. कुंदनलाल गुप्ता नगर, यशोधरानगर, नागपुर २) सलमान खान ईकबाल खान, वय ३० वर्षे, रा. कुंदनलाल गुप्ता नगर, नुरी मस्जीद मागे, यशोधरानगर, नागपुर यांच्या मार्फतीने आरोपी क्र. २ यास विकल्याचे सांगीतले. आरोपी क्र. २ यास छिंदवाडा, मध्य प्रदेश येथुन ताब्यात घेवुन, अटक करण्यात आलेली आहे. त्याचे ताब्यातुन १० ग्रॅम शुध्द सोने किंमती १,५०,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. पाहीजे आरोपींचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. वसंत परदेशी अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग) नागपूर शहर, मा. श्री. नित्यानंद झा, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ५), मा. श्री. रोहीत ओव्हाळ, सहा. पोलीस आयुक्त (कळमना विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. प्रविण काळे, दुपोनि. करीम पठाण, पोउपनि. गजानन राऊत, पोहवा. प्रमोद कंगाले, विशाल भैसारे, पोअं. नितीन मिश्रा, ललीत शेंडे व अविनाश ग्वालबंशी यांनी केली.




**<u>३) पाचपावली पोलीसांची कामगिरी :— वाहन चोरास अटक, ०३ गुन्हे उघडकीस.</u>**

दिनांक २१.०८.२०२६ चे २१.३० वा. ते दिनांक २०.०८.२०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे पाचपावली हद्दीत पंचशिल नगर, राणी दुर्गावती चौक, नागोसे चे घरी किरायाने राहणारे फिर्यादी प्रशांत ओमप्रकाश लेंदे, वय २७ वर्षे यांनी त्यांची होंडा ॲक्टीवा मोपेड क्र. एमएच ४९ आर ४०२८ किंमती ३०,०००/—रू. ची राहते घरासमोर लॉक करून, पार्क करून, ठेवली असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीची नमुद दुचाकी चोरून नेली. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे पाचपावली येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

नमुद गुन्ह्याचे तपासात, पाचपावली पोलीसांनी तांत्रिक तपास करून, आरोपीचा शोध घेत असता, मोतीबाग फुटबॉल ग्राऊंड जवळ एक ईसम संशयीतरित्या ॲक्टीवा गाडीवर फिरतांना दिसल्याने, त्यास घेराव टाकुन ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याचे नांव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नांव अमरदिप पतीराम डोंगरे, वय ३३ वर्षे, रा. वार्ड नं. ४, अन्ना दारू भट्टीजवळ, पोहरा, तह. लाखनी, जि. भंडारा, ह.मु— धम्मदीप नगर, रिगल सेलीब्रेशन जवळ किरायाने, पाचपावली, नागपुर असे सांगीतले. त्याला त्याचेजवळील वाहनासंबंधी कागदपत्रे

विचारली असता, त्याने कोणतेही कागदपत्र सादर केले नाही. त्यास सखोल विचारपुस केली असता, त्याने वर नमुद वाहन चोरीचा गुन्हा करून त्यातील वाहन असल्याचे सांगीतले. आरोपीस गुन्ह्यात अटक करून, केलेल्या चौकशीत आरोपीने वरील गुन्ह्यातील वाहनासह पोलीस ठाणे पाचपावली हद्दीतुन काळ्या रंगाची स्प्लेंडर क्र. एम.एच. डियु. ३४७२ किंमती ३०,०००/—रू. तसेच, होंडा ॲक्टिवा क्र. एम.एच. ४९ झेड ५३७१ किंमती २०,०००/—रू. अशी एकूण ०३ वाहने किमती ८०,०००/—रू. चा मुद्देमाल चोरी केल्याची कबुली दिली. त्याचे ताब्यातुन तिनही वाहने जप्त करण्यात आली आहेत. पुढील तपास पोहवा. विनोद समुद्रे पोलीस ठाणे पाचपावली हे करीत आहेत.

वरील कामगिरी मा. श्रीमती विनीता शाहु अपर पोलीस आयुक्त (उत्तर प्रभाग) नागपूर शहर, मा. श्री. राहुल मदने, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. ३), मा. श्री. शिवप्रसाद पारवे, सहा. पोलीस आयुक्त (लकडगंज विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि. अनिरूध्द पुरी, दुपोनि. विवेक पडघान, सपोनि. सचिन भोंडे, पोहवा. विनोद समुद्रे, फईम खान, प्रविण वावरकर, पोअं. गगन यादव, रूपेश सहारे व शहानवाज मिश्रा यांनी केली.



**<u>४) वाठोडा पोलीसांची कामगीरी :— घरफोडी व वाहनचोरी करणाऱ्या आरोपींना अटक.</u>**

दिनांक १९.०८.२०२६ चे २२.०० वा. ते दिनांक २०.०८.२०२६ चे ०४.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे वाठोडा हद्दीत, प्लॉट नं. ३६, देवश्री नगर, खरबी, नागपूर येथे राहणारे फिर्यादी प्रणय अरविंद चौरे, वय २८ वर्षे हे आपले राहते घराला कुलुप लावुन, परीवारासह वडीलांचे घरी मानेवाडा येथे मुक्कामी गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे राहते घराचे कुलुप तोडुन, आंत प्रवेश करून, लाकडी आलमारीतील रोख ७,०००/—रू. व चांदीचे वेगवेगळे दागिने असा एकुण १५,२५०/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे वाठोडा येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ), ३३१(४), ३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्हयाचे तपासादरम्यान वाठोडा पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रीक तपास करून, आरोपी १) मोहम्मद दानिश अली मोहम्मद अर्शद अली, वय २० वर्षे, रा. गल्ली नं. ४, कादरीया मदरसा जवळ, हसनबाग, नागपुर २) सय्यद सलमान सय्यद जलाल, वय २० वर्षे, रा. गरीब नवाज नगर, यशोधरानगर, नागपुर ३) मोहम्मद अर्शद उर्फ नाबालीक साजीद शेख, वय २० वर्षे, रा. गरीब नवाज चौक, वाठोडा, नागपुर यांना ताब्यात घेवुन, विचारपुस केली असता, त्यांनी संगणमताने वर नमुद घरफोडी केल्याची कबुली दिली. आरोपींना अटक करण्यात आली. त्यांचे ताब्यातुन गुन्ह्यातील चोरी केलेले सर्व चांदीचे वेगवेगळे दागिने जप्त करण्यात आले. आरोपींची अधिक सखोल विचारपुस केली असता, त्यांनी वर नमुद गुन्ह्याव्यतीरिक्त पोलीस ठाणे वाठोडा हद्दीतुन वाहन क्र. १) स्प्लेंडर मोटारसायकल क्र. एम.एच. ३१ डब्ल्युएस ६१७१, २) स्प्लेंडर मोटारसायकल एम.एच. ४९ सिजी ५९६७ ३) पल्सर मोटारसायकल एम.एच. ४० डिएफ ५२४५ असे

एकुण ०३ वाहने चोरी केल्याची कबुली दिली. आरोपींकडुन घरफोडीचा ०१ व वाहनचोरीचे ०३ असे एकुण ०४ गुन्हे उघडकीस आणलेले आहेत. आरोपींचे ताब्यातुन गुन्ह्यातील तीनही वाहने व गुन्ह्यात वापरलेली अॅक्टीवा मोपेड क्र. एम.एच. ४९ सिई ००२३ आणि चांदीचे दागिणे असा एकुण किंमती २,१०,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. वसंत परदेशी अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग) नागपूर शहर, मा. श्री. नित्यानंद झा, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ५), मा. श्री. रोहीत ओव्हाळ, सहा. पोलीस आयुक्त (अती. कार्य. पारडी विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. श्री. प्रमोद पोरे, सपोनि. संजय बन्सोड, अमोल कोल्हे, पोउपनि. अतुल पवार, पोहवा. अनुप तायवाडे, पोअं. प्रमोद राठोड, वामन कालेकर, निखल मेश्राम, सुरेंद्र नंदुरकर, चेतन उतखेडे व जितेंद्र मनगटे यांनी केली.




**<u>५) एस्कॉर्ट पथकाची कामगीरी :— प्रतिबंधीत तंबाखूजन्य पदार्थ विक्री करणाऱ्या आरोपीविरूध्द कारवाई.</u>**

दिनांक २३.०८.२०२६ चे २२.३० वा. चे सुमारास, मा. पोलीस आयुक्त यांचे एस्कॉर्ट पथकाचे अधिकारी व अंमलदार हे पेट्रोलींग करीत असता, त्यांनी मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, पोलीस ठाणे गिट्टीखदान हद्दीत, वैष्णवी ले—आऊट, टेकडी, दाभा येथील रागीट पान पॅलेस येथे पोलीस ठाणे गिट्टीखदान येथील स्टाफ व पंचासमक्ष रेड कारवाई करुन पानटपरीची पाहणी केली असता, तिथे राहणारा इसम नामे चिंतामण शेषराव रागीट, वय ४० वर्षे याने शासन प्रतिबंधीत सुंगधीत विमल, रंजनीगंधा, बाबा ब्लॅक, राजश्री पान, सिग्नीचर, मिराज, पान पराग प्रिमीयम व व्ही वन ईत्यादी तंबाखुजन्य पदार्थांचा साठा विक्रीकरीता ठेवलेला मिळून आला. आरोपीचे ताब्यातुन एकुण १७,६००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी हा स्वतःचे आर्थिक फायद्याकरीता तंबाखुजन्य पदार्थ बेकायदेशीर विक्रीकरीता साठवणुक करून बाळगतांना समक्ष मिळुन आला. आरोपीला मुद्देमालासह गिट्टीखदान पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त यांचे मार्गदर्शनात सपोनि. भगवान कोळी, पोउपनि. दिपक इंगळे, पोहवा. विजय गिरी, आशिष गायधने, पोअं. अर्शद शेख, मनोज निमकर, दिनेश क्षिरसागर, चंद्रकांत मेहेत्रे व मपोअं. अर्चना खंडारे यांनी केली.



**(गुन्हे)**

**पोलीस ठाणे बेलतरोडी :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक १७.०८.२०२६ चे ११.०० वा. ते दिनांक २३.०८.२०२६ चे १०.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे बेलतरोडी हद्दीत प्लॉट क्र. ०७, संत साईकृपा सोसायटी, न्यु लुक कॉन्व्हेंट जवळ, नरेंद्र नगर, नागपूर येथे राहणारे फिर्यादी चे आई—वडील आपले राहते घराला कुलुप लावुन उत्तरप्रदेश येथे देवदर्शनाला गेले असता, त्यांचे राहते घरी चोरी झाल्याचे शेजारी यांनी फिर्यादी यांना फोनद्वारे कळविल्याने, फिर्यादी यांनी येवुन पाहणी केली असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादी आई—वडीलांचे राहते घरातील स्वयंपाक खोलीचे दार तोडुन, घराचे आंत प्रवेश करून, बेडरूममधील लोखंडी आलमारीतील रोख २५,०००/—रू. तसेच, सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती ३,६४,८००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेल्याचे दिसुन आले.

याप्रकरणी फिर्यादी निखील मधुकर पाटील, वय ३४ वर्षे, रा. प्लॉट क्र. ०७, संत साईकृपा सोसायटी, न्यु लुक कॉन्व्हेंट जवळ, नरेंद्र नगर, नागपूर ह.मु.— पुणे यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे बेलतरोडी येथे पोउपनि. नारायण घोडके ९२६०६०८०१० यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) भा. न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**१) पोलीस ठाणे हुडकेश्वर :—** दिनांक २४.०८.२०२६ चे ०८.५० वा. चे सुमारास, फिर्यादी जॉकी कुंडलीक सोहोले, वय ४२ वर्षे, रा. आकोसी, तह. सेलु, जि. वर्धा ह.मु— आऊटर रिंगरोड, हिंदुस्थान हॉटेलचे बाजुला, हुडकेश्वर, नागपुर हे हॉटेलेच बाजुला असलेल्या मोकळ्या जागेमध्ये पाण्याचे डबक्याजवळ शौचास गेले असता, तेथील एका पळसाचे झाडाला एक अनोळखी ३० वर्षीय ईसम दोरीने गळफास घेतलेल्या स्थितीत दिसुन आला. त्यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीसांनी घटनास्थळी कारवाई करून, मृतकाचे कपड्यांची पाहणी केली असता, कोणतीही ओळख पटविणारी वस्तु मिळुन आली नाही. मृतकाचे प्रेत पुढील कार्यवाहीस्तव मेडीकल हॉस्पीटल येथे पाठविण्यात आले आहे. मृतकाची अद्याप पावेतो ओळख पटलेली नाही.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या सुचनेवरुन पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे पोउपनि. प्रविण वाकडे ७५८८५३७१९२ यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे गिट्टीखदान :—** पोलीस ठाणे गिट्टीखदान हद्दीत अनंत नगर, एबाब मस्जीद जवळ, टाईम्स स्केअर बिल्डींग एस.बि.आय. कॉलोनी नागपुर येथे बिल्डींगचे बांधकाम सुरू असुन, तेथे मजुर नामे भुपेंद्र हिराचंदेल, वय २३ वर्षे, रा. रिवा, खैरागड, छत्तीसगढ, हे काम करून ह.मु. तेथेच राहतात. दिनांक २४.०८.२०२६ चे ०९.३० वा. चे सुमारास, क्रेन ने सिमेंट ६ व्या माळ्यावर चढविण्याचे काम सुरू असतांना, ते ६ व्या

माळ्यावर ऑपरेट करीत होते. अचानक त्यांचा ६ वे माळ्यावरून ते जमीनीवर खाली पडल्याने गंभीर जखमी झाले. त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासुन मृत घोषीत केले.

याप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरुन पोलीस ठाणे गिट्टीखदान येथे पोउपनि. कैलास सरकटे ९४०४५३९८१६ यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(ईतर)**

**नागपुर शहर पोलीस बॅडमिंटन संघाचे यश :—**

दिनांक २१.०८.२०२६ व दि. २२.०८.२०२६ रोजी तिसऱ्या अखिल भारतीय पोलीस बॅडमिंटन क्लस्टर २०२६—२७ साठी निवडचाचणी हडपसर, पुणे येथील एसआरपीएफ ग्रुप क्र. ०१ येथे आयोजीत करण्यात आली होती. नागपुर शहर पोलीस आयुक्तालयामार्फत निवड चाचणी करीता एकुण ०७ खेळाडुंची निवड करून, स्पर्धेकरीता पाठविण्यात आले होते. निवड चाचणीमध्ये पोनि. श्री. दिलीप मालन चंदन (गुन्हेशाखा, घरफोडी पथक) यांनी ४५ वर्षे पुरूष दुहेरी वयोगटामध्ये सुवर्ण पदक पटकाविलेले असुन, त्यांची तिसऱ्या अखिल भारतीय पोलीस बॅडमिंटन क्लस्टर २०२६—२७ साठी निवड झालेली आहे. पोनि. श्री. राजेंद्र सुरजप्रसाद गुप्ता (बॉम्ब शोधक व नाशक पथक) यांना ४५ वर्षे पुरूष दुहेरी वयोगटामध्ये उपविजेत पद मिळाले ओह. अखिल भारतीय स्पर्धा ही गुजरात राज्यात होणार असुन, वेळापत्रक येणे बाकी आहे. निवड झालेल्या खेळाडुंचे मा. श्री. विश्वास नांगरे पाटील पोलीस आयुक्त, नागपुर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी, सह पोलीस आयुक्त, नागपुर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), नागपुर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), श्री. वैभव जाधव सहा पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांनी कौतुक करून, अभिनंदन केलेले आहे.




**स्वा/—**
**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**

**वाहतुक शाखेची प्रेसनोट— १**

दिनांक २६.०८.२०२६ रोजी मुस्लीम बांधव ‘‘ईद—ए—मिलाद’’ हा सण साजरा करीत आहेत. त्यानिमीत्त त्यादिवशी मरकजी सिरातुन्नबी कमेटी नागपूर च्या वतीने मिरवणूक काढणार आहेत. ही मिरवणूक ‘‘ईद—ए—मिलाद’’ निमित्त निघणारी मिरवणूक मिरफैज मस्जीद समोरील पेंडाल— सेवासदन चौक— गितांजली चौक— दोसरभवन चौक— भगवाघर चौक— मोमीनपूरा चौक— टिमकी चौक— गोलीबार चौक— गांजाखेत चौक—

तिन नल चौक– शहीद चौक– जुना मोटारस्टॅन्ड चौक– बगदादी चौक– सतरंजीपूरा – घास बाजर – सुभाष चौक – क्वेटा कॉलोनी चौक– टेलीफोन एक्सचेंज चौक– चंद्रशेखर आझाद चौक– दारोडकर चौक– गांधीपुतळा चौक– भावसार चौक– सोना रेस्टॉरेन्ट चौक– अग्रसेन चौक या मार्गाने परत सेवासदन चौकात समाप्त होणार आहे.

मिरवणूकी दरम्यान वाहतुक सुरळीत राहावी, सामान्य जनतेला धोका गैरसोय व अडथळा निर्माण होवू नये म्हणून वाहतुकीचे नियमन करण्याकरिता खालील प्रमाणे अधिसूचना निर्गमीत केली आहे.

दिनांक २६.०८.२०२६ रोजी सकाळी ०६.०० वाजेपासुन मिरवणूक संपेपर्यंत सेन्ट्रल एव्हेन्यू रोडवरील संत्रामार्केट ओव्हरब्रिज ते टेलीफोन एक्सचेंज चौकापर्यत जयस्तंभ चौकातुन सर्व प्रकारच्या वाहतुकीस प्रवेश बंदी करण्यात येत आहे.

१) टेलीफोन एक्सचेंज, दारोडकर चौक सी.ए. रोड ने अग्रसेन चौकाकडे येणारी वाहतूक छापरू चौकातून गंगाबाई घाट चौकाकडे वळविण्यात येत आहे.

२) सोना रेस्टॉरेन्ट चौकाकडून अग्रसेन चौकाकडे येणारी वाहतूक गांधीबाग व बुड्डुखॉ मीनाराकडे वळविण्यात येत आहे.

३) चिटणीस पार्क चौकाकडुन अग्रसेन चौकात येणारी वाहतूक उप मिरवणूका सोडून चिटणीसपार्क येथूनच बडकस चौक व मौलाना नातिक चौकाकडे वळविण्यात येत आहे. मिरवणुक सी.ए रोडला आल्यानंतर गांजाखेत चौकाकडून अग्रसेन चौकाकडे येणारी वाहतूक, लालईमली चौकातून गांधीबाग कडे वळविण्यात येत आहे.

४) भालदारपुरा कडून सेवासदन चौकाकडे येणारी वाहतुक शब्बानी क्लब पासुन बजेरियाकडे वळविण्यात येत आहे.

५) गंजीपेठ कडून तिडके भवन सी.ए. रोडकडे येणारी वाहतूक जूना जेलखाना चौकातून भालदारपूरा व बजेरियाकडे वळविण्यात येत आहे.

६) बजेरियाकडून गितांजली चौकाकडे येणारी वाहतूक संत्रा मार्केट आणि भालदारपुराकडे वळविण्यात येत आहे व डॉ. वाडीया दवाखान्याकडून गितांजली चौकाकडे येणारी वाहतुक हंसापूरी नालसाब चौकाकडे वळविण्यात येत आहे.

अ) बजेरीयाकडून दोसरभवन चौकाकडे येणारी वाहतुक संत्रा मार्केट व भालदारपुराकडे वळविण्यात येत आहे.

ब) बजेरिया भोईपूराकडून मेयो हॉस्पीटलकडे येणारी वाहतुक संत्रा मार्केट भालदारपुराकडे वळविण्यात येत आहे.

७) जयस्तंभ चौकातुन संत्रा मार्केट ओव्हरब्रिज वरून मेयो हॉस्पीटलकडे येणारी वाहतुक जयस्तंभ चौकातुनच मानस चौक, लोहापुल मार्गे कॉटन मार्केट कडे वळविण्यात येत आहे.

८) मेयो हॉस्पीटलकडून भगवाघर चौकाकडे येणारी वाहतुक बजेरिया भोईपूराकडे तसेच, हंसापूरी कडून भगवाघर चौकाकडे येणारी वाहतुक डॉ. वाडीया यांच्या दवाखान्याजवळून गिताजंली टॉकीजकडे वळविण्यात येत आहे.

९) मोतीबाग गार्ड लाईन व बोरीपूरा गरीबनवाब मस्जिदकडून मोमीनपूरा चौकाकडे येणारी वाहतुक रेल्वे ब्रिजकडे वळविण्यात येत आहे व टिमकीकडून मोमीनपूराकडे येणारी वाहतुक टिमकी तिनखंबा येथून वळविण्यात येत आहे.

१०) नालसाब चौकाकडून टिमकी तिनखंबा चौकाकडे येणारी वाहतुक टिमकी चुना मस्जिद कडून वळविण्यात येत आहे.

११) कमाल चौकाकडून गोळीबार चौकाकडे येणारी वाहतुक कमाल चौकातून व पांचपावली पहिला फाटक येथून वैशाली नगर कडे वळविण्यात येत आहे.

१२) मस्कासाथ कडून गोळीबार चौकाकडे येणारी वाहतुक भारतमाता चौकातून जागनाथ बुधवारी चौकाकडे वळविण्यात येत आहे.

१३) लाल इमली चौकाकडून गांजाखेत चौकाकडे येणारी वाहतुक नंगा पुतळा चौकाकडे वळविण्यात येत आहे.

१४) नंगा पुतळा चौकाकडून तिननल चौकाकडे येणारी वाहतुक भावसार चौकाकडे व लाल ईमली चौकाकडे वळविण्यात येत आहे.

१५) ईतवारी सिटी पोस्ट ऑफिस कडून जुना भंडारा रोडकडे येणारी वाहतुक टांगा स्टॅन्ड चौकाकडे वळविण्यात येत आहे.

१६) मस्कासाथ चौकातून शहीद चौकाकडे येणारी वाहतुक मारवाडी चौकाकडे वळविण्यात येत आहे.

१७) नेहरू पुतळा कडून जुना भंडारा रोडकडे येणारी वाहतुक मारवाडी चौकाकडे वळविण्यात येत आहे.

१८) टांगा स्टॅन्डकडून शहीद चौकाकडे येणारी वाहतुक निकालस मंदिराकडे वळविण्यात येत आहे.

१९) जुना दानागंज चौकाकडून सुनिल हॉटेल चौकाकडे येणारी वाहतुक जुना दानागंज चौकातून छापरू चौकाकडे व रेल्वे माल धक्क्याकडे वळविण्यात येत आहे.

२०) सतरंजीपूरा छोटी मस्जिद कडे येणारी वाहतुक, मारवाडी चौकाकडे वळविण्यात येत आहे.

२१) गंगाबाई घाट चौकाकडून टेलीफोन एक्सचेंज चौकाकडे येणारी वाहतूक गंगाबाई घाट चौकातून हिवरी नगर चौकाकडे व शिवाजी नगरकडे वळविण्यात येत आहे. तसेच, छापरू चौकाकडून टेलीफोन एक्सचेंज चौकाकडे येणारी वाहतूक छापरू चौकातून जूना बगडगंज कुंभारपुरा चौकाकडे व जुना दानागंज चौकाकडे वळविण्यात येत आहे.

२२) टेलीफोन एक्सचेंज चौकाकडुन सी.ए. रोडने चंद्रशेखर आझाद चौकाकडे येणारी वाहतूक गंगाबाई घाट चौकाकडे व छापरू चौकाकडे वळविण्यात येत आहे.

२३) हिदुंस्थान शाळेकडून कोलबास्वामी चौकाकडे येणारी वाहतूक निकालस मंदिराकडे व जूनी मंगळवारी भोईपूरा कडून येणारी वाहतुक भोईपूरा येथुन जुनी मंगळवारी गुजरी चौकाकडे वळविण्यात येत आहे.

२४) लकडापूल चौकाकडून चंद्रशेखर आझाद चौकाकडे येणारी वाहतूक जूनी मंगळवारी कडे व मासूरकर चौकाकडून चंद्रशेखर आझाद चौकाकडे येणारी वाहतूक निकालस मंदिर ईतवारी कडे वळविण्यात येत आहे.

२५) निकालस मंदिर कडून दारोडकर चौकाकडे येणारी वाहतूक जुनी मंगळवारी मासुरकर चौकाकडे वळविण्यात येत आहे.

२६) बडकस चौकाकडून व टांगा स्टॅन्डकडून गांधीपुतळा चौकाकडे येणारी वाहतूक बडकस चौकातून लकडापुल चौकाकडे व चिटणिसपार्क तसेच, नंगा पुतळा चौकाकडे वळविण्यात येत आहे.

२७) नंगापूतळा चौकाकडून भावसार चौकाकडे येणारी वाहतूक तहसील पोलीस ठाणे जवळून व्हाया नमकगंज सिटी पोस्ट ऑफिस कडे वळविण्यात येत आहे.

२८) चित्रा टॉकिजकडून सोना रेस्टॉरेन्टकडे येणारी वाहतूक अग्रवाल कवेलू भंडार जवळ इलाहाबाद बॅकेचे मागून जलालपुराकडे वळविण्यात येत आहे व गांधीबाग कडून सोना रेस्टॉरेन्ट चौकाकडे येणारी वाहतूक नंगा पूतळाकडे वळविण्यात येत आहे.

**सदरची अधिसुचना दिनांक २६.०८.२०२६ रोजी सकाळी ०६.०० वा. ते मिरवणुक संपेपर्यंत अंमलात राहील.**

ऐनवेळी निर्माण झालेल्या परिस्थीती व आवश्यक्तेनुसार एखादया चौकातुन रहदारी अन्य मार्गाने वळविण्याचा अधिकार वाहतूक पोलीस अधिकाऱ्यांना प्रदान करण्यात येत आहे.

नागपूर शहरातील सर्व नागरिकांना व वाहन चालकांना विनंती आहे की, गैरसोय होवू नये यास्तव उपरोक्त नमुद कालावधीत त्या मार्गाचा वापर करू नये तसेच शहर वाहतूक शाखेतील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना सहकार्य करावे.

## वाहतुक शाखेची प्रेसनोट– २

दिनांक २६.०८.२०२६ रोजी ''ईद–ए–मिलाद'' हा सण मुस्लीम बांधव नागपूर शहरात साजरा करणार आहेत. त्या निमित्ताने निघणाऱ्या मिरवणूकीत भाग घेण्यासाठी मुस्लीम बांधव मोठया प्रमाणात अग्रसेन चौक सी. ए. रोड येथे एकत्रीत होत असल्यामूळे वाहतुकीची समस्या निर्माण होणार आहे. त्या अनुषंगाने दिनांक २६.०८. २०२६ रोजी नागपूर शहरात जड वाहनांना प्रवेश बंदी करणे आवश्यक आहे. वाहतूकीस अडथळा निर्माण होवू नये तसेच, सर्वसामान्य जनतेची गैरसोय होवू नये व वाहतूक सूरळीत राहावी म्हणून खालील प्रमाणे वाहतूकीवर निर्बंध घालण्याकरीता अधिसूचना निर्गमित करण्यात आली आहे.

**दिनांक २६.०८.२०२६ चे सकाळी ०६.०० ते मिरवणुक संपेपर्यंत नागपूर ग्रामीण कडुन नागपुर शहराकडे येणारे संपूर्ण जड वाहनांना प्रवेश बंदी राहील. वाहन चालकांनी या दरम्यान नागपूर शहराबाहेरील आऊटर रिंग रोड चे वापर करावे.**

- **ज्या जड वाहनांना शहरात निर्बंधित वेळेत परवानगी देण्यात आली आहे, त्या जड वाहनांना दिनांक २६.०८.२०२६ चे सकाळी ०६.०० ते मिरवणुक संपेपर्यंत प्रवेश बंदी राहील.**
- सदरची अधिसुचना दिनांक २६.०८.२०२६ रोजी सकाळी ०६.०० वा. ते मिरवणुक संपेपर्यंत अंमलात राहील.

ऐनवेळी निर्माण झालेल्या परिस्थीती व आवश्यक्तेनुसार एखादया चौकातुन रहदारी अन्य मार्गाने वळविण्याचा अधिकार वाहतूक पोलीस अधिकाऱ्यांना प्रदान करण्यात येत आहे.

नागपूर शहरातील सर्व नागरिकांना व वाहन चालकांना विनंती आहे की, गैरसोय होवू नये यास्तव उपरोक्त नमुद कालावधीत त्या मार्गाचा वापर करू नये तसेच, शहर वाहतूक शाखेतील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना सहकार्य करावे.

**स्वा/–**

**(आदित्य मिरखेलकर, भापोसे)**

पोलीस उप आयुक्त, वाहतूक,

नागपूर शहर.